# देवाने आमचे तारण करण्यासाठी ''कोकरा'' दिला

प्रभुभोजनाची प्रशंसा करण्यास मुलांना मदत करा.

मुलांसाठी पुढीलपैकी कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम निवडा मोठे मूल किंवा शिक्षकांनी: उत्पत्ती 22:1-18 मधून

अब्राहाम व इसहाक ह्यांचा कथा वृत्तांत वाचावा किंवा सांगावा.

एका तरूण मुलाचा जीव वाचवण्यासाठी देवाने कशा प्रकारे एडका पुरविला त्याबद्दल येथे सांगितले आहे.

कथावृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा:

- देवाने अब्राहामाच्या विश्वासाची परीक्षा कशी घेतली? *(उत्तर,पाहा वचन 2)*
- अब्राहामाने देवाच्या आज्ञेचे पालन कसे केले? *(3)*
- प्रवासात इसहाकाने अब्राहामाला कोणता प्रश्न विचारला? *(7)*
- अब्राहामाने इसहाकाला काय उत्तर दिले? *(8)*
- देवाने अब्राहामाला इसहाकाला मारण्यापासून कसे थांबवले *(11)*
- देवाने अर्पणासाठी कशाची तरतूद केली? *(13)*
- अब्राहामाच्या आज्ञापालनाबद्दल देवाने त्याला कोणता आशीर्वाद दिला? *(16-18)*



**शक्य असल्यास मुलाना हे चित्र रंगवायाला सांगा**

**स्पष्ट करा:** प्रभुभोजनामइये आपण देवाच्या कोक-याच्या शरीरात व रक्तामध्ये सहभागी होतो. इसहाकाच्या ऐवजी जसा एडका मेला त्याप्रमाणे आमच्या ऐवजी देवाचा कोकरा वधस्तंभावर खिळला गेला.

उत्पत्ती 22:1-18 मधून अब्राहाम व इसहाक यांच्या कथावृत्तांताचे नाट्यी करण करा. मुलाना उपासनेमध्ये मोठया माझणसंसमोर नाटिका सादर करता यावी यासाठी पुढा-यांशी बोलून व्यवस्था करा-मुलांना कविता(पुढे दिलेली) सादर करता यावी तसेच काढलेले चित्र दाखवता यावे यासाठीही व्यवथा करा.

- मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात (1) निवेदक, (2) देवदूत आणि (3) अब्राहाम याच्या हातात सुरा व दोर आहे (किवा ते वापरत असल्याचा अभिनय करा)
- लहान मुलानी पुढील भूमिका कराव्यात-

**इसहाक**

**एडका,** हात-पाय टेकवून ओणवे चाला.

**सेवक** (लाकडांची मोळी वाहा).

**निवेदक:** वचने 1-6 मधून कथावृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''देव अब्राहामाला काय म्हणाला ते ऐका,''

**देवदूत:** ''सर्वसमर्थ देवाने तुला तुझ्या मुलाचे मोरिया डोंगरावर जाऊन होमार्पण करण्याची आज्ञा केली आहे.''

**अब्राहाम:** वर पाहून म्हणा, ''होय प्रभू.'' सेवकांना सांगा,''सेवकाहो इसहाकाला आणा, तसेच सोबत लाकडे आणि सुरा घ्या.''

**सेवक:** जा आणि सोबत इसहाक, लाकडे व सुरा घेऊन या (किवा तसा अभिनय करा) हे सवे अब्राहामाकडे ह्या.

**अब्राहाम:** लाकडे इसहाकाच्या पाठीवर ठेवा सुरा हातात धरा.

**निवेदक:** वचने 7-10 मधून कथावृत्तांताचा दुसरा भाग सांगा. आणि म्हणा, ''इसहाक काय म्हणतो ते ऐका.''

**इसहाक:** बाब हो मार्पणा साठी कोकरूं कोठे आहे?'

**अब्राहाम:** "बाळा देव स्वत: होमार्पणा साठी कोकरू पाहुन देईल.''

**इसहाक:** वेदी म्हणून टेबल किंवा खुर्ची ठेवून त्यावर झोपा.

**अब्राहाम:** इमहाकाल दोरीने बांधा (किंवा तसा अभिनय करा) हात वर करून सुरा धरा.

**देवदूत:** ''थांब अब्राहाम,त्याला मारू नकोस. तू देवापासून आपला एकुलता एक मुलगाही राखून ठेवला नाहीस यावरून तू देवाला भिहुन चालणारा आहेस हे मला कळले.''

**निवेदक:** वचने 11-18 मधून कथावृत्तांत्ताचा तिसरा भग सोगा.

**कोकरू:** खोलीच्या दुसऱ्या बाजूने कोकरासारखे बें बें असा मोठयाने आवज करा.

**इसहाक:** ''बाबा, ते पाहा! त्या झुडपात एक एडका आडकला आहे.देवाने आपल्यासाठी होमार्पण पाहून दिले आहे''

**अब्राहाम:** इसहाकाला बांधलेली दोरी सोडून म्हणा,''जा, जाऊन तो एडका येथे वेदीवर आणून बांध.''

**देवदूत:** ''अब्राहाम, देवाचे सर्वकालचे अभिवचन ऐक. आज्ञापालन केले याबद्दल तो तुला आशीर्वादित करणार आहे. तुझी संतती पुष्कळ होईल, त्यापैकी एकाच्या द्वारे तो सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करणार आहे.

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या सर्वांचे आभार माना

कोकराचे चित्र काढा.



- मुलांनी काढलेले चित्र पुढच्या उपासनेच्या वेळी माोठया माणसांना दाखवावे आणि आमची पातके वाहून नेण्यासाठी येशू आमच्याकरीता देवाचा कोकरा झाला हे ह्या चित्रावरून दिसते असे स्पष्ट करून सांगा.
- मोठया मुलानी लहान मुलांना मदत करावी.

देवाने आब्राहमाला दिलेले आभिवचन येशु ख्रिस्तामध्ये आमच्या साठी आज खरे कसे झाले हे मुलांना विचारा. पाठ करा रोम 6:23

**कविता.** चारमुलाना स्तोत्र 27:1, 2, 13 व 14 ही वचन प्रत्येकी एक अशी म्हणायला सांगा.

परमेश्वार माझा प्रकाश व माझे तारण आहे, मी कोणाची भीती बाळगू?

परमेश्वर भाझ्या जिवाचा दुर्ग आहे मी कोणाचे भय धरू?

दुस्कर्मी म्हणजे माझे शत्रू व द्वेष्टे हे माझे मांस खाऊन टाकण्यास जेव्हा माझ्यावर चढाई करून आले,तेव्हा तेच ठेच लागून पडले. ह्या जिवंतांच्या भूमीवर परमेश्वार खात्रीने माझे कल्याण करील. परमेश्वराची प्रतीक्षा कर, खंबीर हो, हिंमत धर, परमेश्वराचीच प्रतीक्षा कर.

देवाने आमच्या तारणासाठी कोकरा पाहून दिला ह्या विषयावर मोठया मुलांनी कविता किंवा गीत लिहावे. आठवडयामध्ये त्यांना हे काम करता येईल.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रेमळ देवबापा, तू आपला पुत्र, देवाचा कोकरा, आमच्यासाठी मरण्याकरीता दिलास याबद्दल आभार मानतो. त्याचे यज्ञार्पण इतके थोर आहे की त्याद्वारे तू आमच्या सर्व पातकांची क्षमा केलीस. प्रभुभोजन घेतांना याची आम्ही आठवण करावी यासाठी आमचे साहाय्य कर. अब्राहामाप्रमाणे आम्हीही तुझे आज्ञापालन करावे अशी कृपा आमच्यावर कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net